SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

(असाधारण)

शुक्रवार, दिनांक ०६ ऑगस्ट, २०२१

अधिसूचना

क्र. : ७८/२०२१. दि. ०६/०८/२०२१.

विषय :- कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या आर्थिक परिस्थिती लक्षात घेता शैक्षणिक सत्र २०२०-२१ मध्ये विद्यापीठ शैक्षणिक विभाग, संलग्नित महाविद्यालये, मॉडेल डिग्री कॉलेज मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश शुल्क व इतर शुल्क माफ करण्यासंदर्भात.

संदर्भ :- १) अधिसुचना क्र. ४२/२०२०, दि. २८.०५.२०२०
२)अधिसुचना क्र. ७६/२०२०, दिनांक १५/१०/२०२०

ज्या अर्थी सत्र २०२०-२१ मध्ये कोविड-१९ कारणास्तव लॉकडाऊनच्या काळात शैक्षणिक विभाग/महाविद्यालये पुर्णपणे बंद राहील्यामुळे त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे दि. ३० जुन, २०२१ चे पत्र प्राप्त झाले आहे व इतर संघटनांनी शुल्क माफ करण्याबाबत विनंती केली होती

आणि

या अनुषंगाने सदर प्रकरण विद्यापीठ प्राधिकारीणीच्या विचारार्थ सादर करण्यात आले होते त्यावर व्यवस्थापन परिषदेने दि. २८ जुलै, २०२१ च्या सभेत विषय क्र. १३८ अन्वये २०२०-२१ सत्राचे विद्यार्थ्याकरीता समितीच्या शिफारशी मान्य करुन खालीलप्रमाणे शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला आहे.

ñविद्यापीठाची अधिसूचना क्र. ५०/२०१५, दि. १८-०६-२०१५ अन्वये निश्चित केलेल्या विविध शिर्षावरील शुल्कामधील खाली नमुद केलेल्या शिर्षावरील शुल्कामध्ये २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात शुल्क माफीसाठी पात्र ठरविण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांचे शुल्क माफ करण्यात येत आहे.

त्याअर्थी सर्व संबधितांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव अधिसुचित करण्यात येते की, उपरोक्त संदर्भाकिंत दोन्ही अधिसुचनेच्या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांचे खालीलप्रमाणे शुल्क सुध्दा माफ करण्यात येत आहे :-

Sr. No.	Item/Head	Prescribed fee
01.	Prospectus and Admission Form	20/-
02.	Game & Sports	135/-
03.	Extra Curricular Activities	70/-
04.	College Magazine	70/-
05.	Medical Examination	45/-
06.	Physical Efficiency Test	25/-
07.	Identity Card	30/-
08.	Vehicle Stand	50/-
	Total	445/-

(अ) अंशत शुल्क माफीसाठी पात्र विद्यार्थी –

१. सत्र २०२०-२१ मध्ये नियमित प्रवेशित.
२. बिगर शिष्यवृत्ती धारक किंवा कोणत्याही शिष्यवृत्तीसाठी पात्र नसलेला.

३. शिष्यवृत्तीसाठी पात्र नाही किंवा कोविड-१९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता तांत्रिक व अन्य कारणामुळे शिष्यवृत्ती मंजुर झालेली नसेल अशा विद्यार्थ्यांबाबत प्राचार्याने त्यांच्या स्तरावर शहानिशा करुन शुल्क माफ करावयाचे आहे.

(ब) पुर्ण शुल्कमाफीसाठी पात्र विद्यार्थी –

१. ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनीचे आई किंवा वडील किंवा दोघेही कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे मयत झाले असतील.
२. प्रत्यक्षरित्या विद्यार्थ्याचा कोविडमुळे मृत्यु झाला असेल.

उक्त नमुद शुल्काव्यतिरीक्त अनुदानित महाविद्यालये व विद्यापीठ विभागातील सर्व अभ्यासक्रमांसाठी आकारण्यात येणा-या इतर शुल्कांमधील **जिमखाना शुल्क, संगणक शुल्क, वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टीवल** या शिर्षावर शुल्क आकारण्यात येत असल्यास वर नमुद केल्याप्रमाणे पात्र विद्यार्थ्यांचे असे शुल्क पुर्णपणे माफ करण्यात येत आहे. ò

उपरोक्त शुल्क माफी ही फक्त सत्र २०२०-२१ साठी राहील.

स्वा/-
(डॉ. तुषार देशमुख)
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****